| PUBLICATION | DATE | EDITION |
|---|---|---|
| Sakal | September 13, 2011 | Pune |



# ट्रायकॉम कंपनीतर्फे विस्तार योजना जाहीर

पुणे, ता. १२ : ट्रायकॉम फ्रूट प्रॉडक्टस् लि. या फलोत्पादन प्रक्रियेतील कंपनीने एका वर्षाच्या यशस्वी वाटचालीनंतर आता विस्ताराची योजना जाहीर केली आहे. कंपनीचा उत्पादन प्रकल्प पुण्याजवळ अन्दुरी गावात आहे. पहिल्या वर्षात निर्यात बाजारपेठेत आपले पाय घट्ट रोवल्यानंतर आता स्थानिक बाजारपेठेत ठसा उमटविण्याची ट्रायकॉम फ्रूटची योजना आहे. नवीन फळे आणि भाज्यांचा अर्क यांवर प्रक्रिया करून नवीन उत्पादने विकसित करण्यावर या कंपनीचा मुख्य भर असणार आहे, असे कंपनीचे अध्यक्ष चेतन कोठारी यांनी म्हटले आहे.